सागर प्रकाशनचे
# सांजवार्ता
आज लक्ष्मीपूजन
बुधवार, दि. ७ नोव्हेंबर २०१८, औरंगाबाद-जालना | सर्वाधिक खपाचे सायंदैनिक | • वर्ष बाविसावे • अंक ७८ वा • पृष्ठे ८ • किंमत २ ₹

# लक्ष्मी पूजनाची जय्यत तयारी

## ■ कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहन खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड

औरंगाबाद, दि.७ (सांजवार्ता ब्युरो) : दिवाळी सणातील वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्थी साजरी झाल्यानंतर आज लक्ष्मीपूजन करण्यात येणार आहे. लक्ष्मी पूजनाला विशेष महत्व असल्याने नागरिकांनी लक्ष्मी पूजनासाठी जोरदार तयारी केली आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी इलेक्ट्रॉनिक वस्तू, टी.व्ही., फ्रिज, वॉशिंग मशिन, दुचाकी, चारचाकी वाहने, पूजेचे साहित्य व कपडे खरेदीसाठी नागरिकांची बाजारात झुंबड उडाली होती.



▸▸ दिवाळीनिमित्त लक्ष्मीचे छायाचित्र असलेल्या वह्या खरेदी करताना ग्राहक.

शहरातील बाजारपेठेत सकाळपासून विविध वस्तूंसह पूजेचे साहित्य आणि फटाके खरेदी करताना गर्दी दिसून आली. धन, सुख, शांती आणि समृद्धीसाठी दिवाळीत लक्ष्मीपूजन केले जाते. दिवाळीनिमित्त नागरिकांनी घराला रंगरंगोटीसह विद्युत दिवे, आकाश कंदील, आकर्षक रोषणाई करुन लखलखाट केला आहे. लक्ष्मी पूजनासाठी आज सकाळी ६.३१ पासून ते पाहाटे ४-५० पर्यंत मुहूर्त आहेत. दिवाळीनिमित्त शहरातील व्यापाऱ्यांनी विविध वस्तू बाजारपेठेत विक्रीसाठी आणल्या आहेत. दिवाळीला नवीन कपडे खरेदी केले जातात. तसेच साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या पाडव्याच्या मुहूर्तावर ही खरेदी केली जाते. दिवाळीला कर्मचारी आणि कामगारांना पगारासह बोनस मिळाला असल्याने नवीन वस्तू खरेदीकडे त्यांचा विशेष कल असतो. यंदा मराठवाड्यात दुष्काळाची स्थिती आहे. असे असले तरी या दुष्काळाचा परिणाम बाजारपेठेवर झालेला नाही. ▸▸पान ५ वर

# भाचीला गावी घेऊन जाणाऱ्या मामाचा मृत्यू

## ■ ५ वर्षीय चिमुकलीची मृत्यूशी झुंज



औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो): दिवाळीच्या निमित्ताने जोगेश्वरी येथून पाच वर्षीय भाचीला वैजापूर तालुक्यातील बेंडेवाडी येथे घरी घेऊन जाणाऱ्या मामाच्या दुचाकीला भरधाव आयशर ट्रकने चिरडले. या भीषण अपघातात २५ वर्षीय मामाचा जागीच मृत्यू झाला तर चिमुकली गंभीर जखमी झाली. ही घटना आज सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास मुंबई हायवेवर खोजेवाडी-शिंदी शिरसगाव फाट्यावर घडली. दीपक पूनमचंद महेर (वय २५, रा.बेंदवाडी, ता. वैजापूर) असे ▸▸पान ५ वर

## नातवाच्या झोक्याच्या दोरीने आजोबाने घेतला गळफास

औरंगाबाद,दि.७ (सांजवार्ता ब्युरो): नातवाच्या झोक्याच्या दोरीने ५४ वर्षीय आजोबाने राहत्या घराच्या दुसऱ्या मजल्यावर छताला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास विजयनगर येथे उघडकीस आली. मधुकर केरबा गवळी (वय ५४, रा.विजयनगर, गारखेडा परिसर) असे आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे.

आज पहाटे गवळी यांच्या खोलीत त्यांच्या नातेवाईकांनी डोकावले असता, त्यांनी नातवाच्या झोक्याच्या दोरीने छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेतल्याचा प्रकार समोर आला. गवळी यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले हे अद्याप स्पष्ट झाले नाही. या प्रकरणी पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


















e-paper on...
www.sanjwarta.in

### आज शहरात टॉप टेन



| | |
|---|---|
| १ | आज घरोघरी दिवाळीनिमित्त लक्ष्मीपूजन |
| २ | राजाबाजार खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात धार्मिक कार्यक्रम |
| ३ | शहानूरमियाँ दर्गा येथील मनपा मैदानावर किल्ले बनवा, किल्ले रंगवा स्पर्धा |
| ४ | मालती आर्ट गॅलरीत कला प्रदर्शन |
| ५ | बुद्धिस्ट असो.तर्फे राणाजी मंगल कार्यालयात अभिवादन सभा |
| ६ | मनपात कामगारांसोबत दिवाळी उत्सव |
| ७ | सिडको एन- ७ येथील महादेव मंदिरात धार्मिक कार्यक्रम |
| ८ | कुलस्वामिनी मंगल कार्यालयात त्रिरत्न महासंघाचे शिबीर |
| ९ | त्रिवेणी बुद्धविहारात धम्म देसना शिबीर |
| १० | विद्यार्थी दिनानिमित्त विविध कार्यक्रम |

अजिंठा बँक
आता कर्जावरील व्याज अजून कमी
• मुदत कर्ज: १६%
• कॅश क्रेडीट कर्ज: १५.५०%
• ओ.डी.ए.पी.आर.कर्ज: १६.५०%
• सोने तारण कर्ज: १४%
• गृह कर्ज: १३.५०%
0240-6600715, 6600720.
उस्मानपुरा: 0240-6600739, 6600745.
Website : www.ajanthabank.com
E-mail : ceo@ ajanthabank.com

### सुट्टीची सूचना

दिवाळीनिमित्त सांजवार्ता कार्यालयास दि. ८ व ९ नोव्हेंबर रोजी सुट्टी राहणार आहे. त्यामुळे दोन दिवस अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट, वितरक यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

सर्व जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!

## मोदींची दिवाळी जवानांसोबत

नवी दिल्ली, दि.७ (वृत्तसंस्था): दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्य दलातील जवानांसोबत उत्तराखंडमधील हर्षील येथे दिवाळी साजरी केली. जवानांसोबत दिवाळी साजरी केल्यानंतर मोदींनी केदारनाथला जाऊन शिवशंकराचे दर्शनही घेतले.

### पटलं तर हसा...

**मास्तर :** सोन्या सांग की, चंद्रावर पहिले पाऊल कोणी टाकले?
**सोन्या :** निल आर्मस्ट्राँग
**मास्तर :** अगदी बरोबर...
आणि दुसरे पाऊल कुणी टाकले?
**सोन्या :** तेनच टाकलं असंल की, ते काय लंगडं वाटलं व्हय तुम्हाला...!



बदलत्या काळाची साथ... आता सोबतीला सांजवार्ता वेब पोर्टल. ताज्या बातम्यांसाठी अवश्य भेट द्या.
www.sanjwarta.in

